# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

दूरध्वनी क्र. ०२०–२५६०११४३, २५६०११४२, टेलिफॅक्स ०२०–२५६९७५११

संदर्भ: विक्रीमं/३/१६५१

दिनांक: ०२ ऑगस्ट, २०१९.

प्रति,

मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

विषय : खेळाडू पात्रता फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत.....

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस या पत्राद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९–२० आंतर महाविद्यालयीन व आंतर विभागीय क्रीडा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. त्याकरीता शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून आंतर महाविद्यालयीन स्पर्धेकरीता खेळाडू पात्रता फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबतचा ठराव दि. ०७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कुलगुरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या सभेत करण्यात आला आहे. त्याबाबत या कार्यालयाकडून संदर्भ क्र. विक्रीमं/३/१३९४ दि. २४ एप्रिल, २०१९ रोजी परिपत्रकाने कळविण्यात आले आहे. त्याबाबत आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थेमध्ये प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांची इलिजीबीलीटी ऑनलाईन करणे क्रमप्राप्त असल्याने सदर खेळाडू विद्यार्थ्यांची इलिजीबीलीटी आपल्या कार्यालयामार्फत तातडीने करून घ्यावी जेणे की खेळाडू पात्रता फॉर्म ऑनलाईन भरणे शक्य होईल. जर खेळाडू विद्यार्थ्याची इलिजीबीलीटी ऑनलाईन भरली गेली नसल्यास त्या खेळाडूचा पात्रता फॉर्म ऑनलाईन भरता येणार नाही आणि खेळाडू खेळण्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. तरी विनंती की, प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांची इलिजीबीलीटी ऑनलाईन (फी जमा करून) तातडीने करून घ्यावी, ही विनंती.

खालील लिंकवर खेळाडू पात्रता फॉर्म उपलब्ध होतील.

**BOD → BOD Online → Login → For College Users वरून User Name, Password टाकून खेळाडू पात्रता फॉर्म भरणे. User Name, Password** महाविद्यालयास वेबमेलद्वारे विद्यापीठाने कळविले आहेत.

कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

डॉ. दिपक माने
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ,
अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा